**MHST0500 0594 2024**

**विशेष दरखास्त क्र.२७/२०२४**
**१. श्री.मानसिंग किसन सुतार व १**
**वि.**
**१. रमेश भानूदास सुतार व इतर**

**वादीतर्फे विधीज्ञ – श्री. ए. आर. डांगे.**

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ – श्री. ए. बी. निकम.**

**निशाणी १६ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा कलम १ब मध्ये सीटी सर्व्हे मिळकती समाविष्ठ आहे. त्या मिळकतींचे अद्यापपावेता वाटप झालेले नाही. त्यामुळे सिटी सर्व्हे क्र.३५१, ४१९, ६८७ व ६८८ या मिळकतींच्या वाटपाकरीता प्रकरण उपअधिक्षक भूमिअभिलेख/सिटी सर्व्हे ऑफिसर, कराड यांचेकडे पाठविण्यात यावे या करीता दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील हस्तलिखीत प्र.वादी क्र.१ ते ४इ यांचे विधिज्ञांचे म्हणणे पाहिले. दोन्ही बाजूंच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, वादींनी प्रस्तुतची दरखास्त विशेष दिवाणी मु.क्र.६६/२०२३ मध्ये दि.३०/०४/२०२३ रोजी झालेल्या निर्णयाप्रमाणे दावा मिळकतींचे वाटप होवून मिळावे याकरीता दाखल केलेले आहे. दाव्यातील शेतमिळकतींचे म्हणजेच दावा कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतींचे वाटप करण्याठी जिल्हाधिकारी यांचेकडे प्रकरण पाठविणेबाबत यापूर्वीच आदेश पारित झालेला आहे. दावा कलम १ब मध्ये सिटी सर्व्हे क्र.३५१, ४१९, ६८७, ६८८ या मिळकती समाविष्ठ आहेत. त्या मिळकतींचे अद्यापपावेता वाटप झालेले नाही अथवा त्याबाबत अभिलेखावर आदेश पारित झालेला दिसून येत नाही. त्यामुळे वादी यांनी सदर अर्जात केलेल्या मागणीत तथ्य असल्याचे आढळून येते. वादी यांनी मागणी केलेली विनंती मंजूर होण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज (निशाणी १६) मंजूर करण्यात येत आहे.

२. दावा कलम १ब मध्ये नमुद केलेल्या सिटी सर्व्हे क्र.३५१, ४१९, ६८७, ६८८ या मिळकतींचे वाटप होण्याकरीता प्रकरण भुमिअभिलेख तथा सिटी सर्व्हे ऑफिसर, कराड यांचेकडे नियमाप्रमाणे पाठविण्यात यावे.

SUDHIR BALASAHEB TODKAR

Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2025.02.14 17:59:16 +0530

कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः १४/०२/२०२५ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.